आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १६ नोव्हेंबर २०२५

ठळक बातम्या

1. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी महायुतीच्या जागा वाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास.

2. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक काँग्रेस नेत्यांचा भाजपमध्ये प्रवेश.

3. राज्यातल्या शाळा आणि महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटीच्या नवीन बस मिळणार.

4. कोलकाता इथं झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा भारतावर ३० धावांनी विजय.

मुख्यमंत्री

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महायुतीच्या जागावाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. छत्रपती संभाजीनगर इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. या निवडणुकांच्या जागावाटपाचे निर्णय जिल्हास्तरावर होतात, त्यामुळे काही ठिकाणी महायुती झाली आहे, काही ठिकाणी दोन पक्ष एकत्र आले आहेत, तर काही ठिकाणी कोणत्याही पक्षांमध्ये युती झालेली नाही. यावर चर्चा सुरू आहे, असंही ते म्हणाले. महानगरपालिकांच्या निवडणुकीत मात्र शक्य तिथं युती होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. छत्रपती संभाजीनगर इथं माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा आणि परिसर सुशोभीकरणाच्या कामाचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.

भाजप प्रवेश

मौदा तालुक्यातील काँग्रेस नेते आणि प्रदेश सचिव प्रसन्ना तिडके यांच्यासह काँग्रेसच्या शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी आज नागपूरचे पालकमंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. कोराडी येथील जनसंपर्क कार्यालयात हा पक्ष प्रवेश झाला. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा त्यांच्या नेतृत्वावर विश्वास राहीलेला नाही. त्यामुळे त्यांचे कार्यकर्ते नाराज होऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपमध्ये प्रवेश करत आहे, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले. ग्रामीण

काँग्रेससाठी हा धक्का मानला जात आहे. तर वाशिम शहरात देखील भारतीय जनता पक्षात शिवसेना उबाठा, काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी आणि माजी नगरसेवकांचा पक्ष प्रवेश करण्यात आला. जवळपास 15 ते 20 कार्यकर्त्यांनी भाजप मध्ये प्रवेश घेतला आहे.

प्रफुल्ल पटेल

गोंदिया जिल्यात होऊ घातलेल्या नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणूक स्वबळावर लढणार असल्याची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते खासदार प्रफुल पटेल यांनी आज गोंदियात केलीं असून आज संध्याकाळ पर्यंत तिकिटांचे वितरण देखील करणार असल्याची माहिती पटेल त्यांनी दिली.

गोंदिया जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सक्षम आहे. त्यामुळे होऊ घातलेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जास्तीत जास्त उमदेवार निवडून येतील असा विश्वास खासदार प्रफुल पटेल यांनी व्यक्त केला आहे.

नगर परिषद निवडणुक- नामनिर्देशनपत्रे

गडचिरोली जिल्ह्यात नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी काल १३ जणांनी नामनिर्देशनपत्रे दाखल केली. गडचिरोली इथ नगरसेवक पदासाठी दोन, देसाईगंज इथ सहा तर आरमोरी इथ पाच जणांनी अर्ज दाखल केले. देसाईगंज आणि आरमोरी येथे प्रत्येकी एका व्यक्तीने नगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल केले.

सुधारीत वेळापत्रक

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी दि. 1 नोव्हेंबर 2025 या अर्हता दिनांकावर आधारित नवीन मतदार यादी तयार करण्याचे सुधारीत वेळापत्रक भारत निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. त्यानुसार महत्वाच्या टप्प्यांतील हस्तलिखिते तयार करणे आणि प्रारुप मतदार याद्यांची छपाई ही दि. 28 नोव्हेंबर, 2025 पर्यंत करण्यात येणार आहे. त्यानंतर 3 डिसेंबर रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी करण्यात येणार आहे. या मतदार याद्यांवर 3 ते 18 डिसेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. त्यानंतर 12 जानेवारी 2026 रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करण्यात येणार आहे, असे अमरावती विभाग शिक्षक

मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी पत्राव्दारे कळविले आहे.

<u>पत्रकारिता दिवस</u>

राष्ट्रीय पत्रकारिता दिन आज साजरा होत आहे. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना या दिवशी १९६६ मधे झाली होती. वर्तमानपत्रं आणि प्रसारमाध्यमांवर नैतिकदृष्ट्या देखरेख ठेवण्याचं काम ही संस्था करते. पत्रकारितेची स्वतंत्रता आणि जबाबदारी यांचं ते प्रतीक मानलं जातं. पत्रकारितेतल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे राष्ट्रीय पुरस्कार या दिवशी प्रदान करण्यात येतात. लोकशाहीमध्ये पत्रकारितेची भूमिका महत्त्वाची असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं. नवी दिल्ली इथं आज राष्ट्रीय पत्रकारिता दिनानिमित्त आयोजित समारंभाला मंत्री अश्विनी वैष्णव, माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल मुरुगन, तसंच पीसीआयच्या अध्यक्ष न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई उपस्थित होत्या.

<u>मंत्री प्रताप सरनाईक</u>

राज्यातल्या शाळा आणि महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या नवीन बस उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. शिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाचा आनंद घेता यावा हा यामागचा उद्देश असल्याचं त्यांनी सांगितलं. याअंतर्गत एसटीच्या राज्यभरातल्या दोशने एक्कावन्न आगारांमधून दररोज आठशे ते हजार बस उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. सहलींसाठी शाळा महाविद्यालयांना सवलीत बस उपलब्ध करून दिल्यानं, महामंडळाला मागच्यावर्षी ९२ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला होता.

<u>सिल्क साडी</u>

मुंबईतील अंधेरी इथं मराठी फॅशन विकचं आयोजन करण्यात आलं आहे. काल झालेल्या फॅशन शोमध्ये मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी भंडारा जिल्ह्यातील करवत हि रेशीम साडी सादर केली. ऐकुया हा विशेष रिपोर्ट-

*महाराष्ट्राच्या परंपरेतून, वारशाच्या धाग्यातून आणि नव्या विचारांच्या रंगातून विणलेला एक सुंदर उत्सव असं या मराठी फॅशन विकचं वर्णन करण्यात आलं आहे. यात राज्यातील विविध भागातील पारंपरिक वस्त्र सादर करण्यात येत आहे. भंडारा जिल्ह्यातील आंधळगाव येथील गोपीचंद निनावे यांची हात मागावर विणलेली रेशीमची करवत साडी*

*अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने सादर केली. आंधळगाव येथील निनावे यांच्याकडे तयार होणारी टस्सर सिल्क करवत साडी ही हात मागावर विणण्यात येते. ही साडी बनवायला साधारणता दहा ते बारा दिवस लागतात. करवती सिल्क साडी हे भंडाऱ्याचे उत्पादन मुंबई फॅशन शो मध्ये सर्वांच्या पसंतीस उतरली. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी नम्रता फलके)*

<u>आयआयएम नागपूर</u>

ऊर्जा हीच खरी शक्ती असून भारताच्या विकास प्रवासासाठी कुशल ऊर्जा व्यवस्थापकांची आवश्यकता आहे, असं मत आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराय मेत्री यांनी व्यक्त केलं. त्यांनी आज आयआयएम नागपूरमध्ये ऊर्जा व्यवस्थापन विषयातील 'एक्झिक्युटिव्ह एमबीए' या अभ्यासक्रमाच उद्घाटन केलं. राष्ट्रीय ऊर्जा प्रशिक्षण संस्था -NPTI- यांच्या सहयोगाने हा विशेष अभ्यासक्रम कार्यरत व्यावसायिकांसाठी सुरू करण्यात आला आहे. या पहिल्या बॅचमध्ये देशातील 16 राज्यांमधून विद्यार्थी सहभागी झाले आहेत. एकूण 168 अर्जांपैकी 43 कार्यरत व्यावसायिकांची पहिल्या बॅचसाठी निवड करण्यात आली आहे.

<u>महावितरण क्रीडा</u>

महावितरणच्या 2025-26 च्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे-बारामती परिमंडळ संघाने वर्चस्व गाजवत सर्वसाधारण अजिंक्यपद पटकावले. तर नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडळ संघान स्पर्धेतील उपविजेतेपद मिळविल. अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडासंकुलात दि. 12 नोव्हेंबरपासून सुरू असलेल्या चार दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धेचा काल सायंकाळी समारोप झाला.

<u>दक्षिण पूर्व मध्य रेल्वे-"वंदे मातरम्"</u>

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे "वंदे मातरम्" या राष्ट्रीय गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त काल संगीत मैफिलीचं आयोजन करण्यात आलं होतं. आग्नेय पूर्व मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. "वंदे मातरम् हे केवळ एक गाणे नसून आपल्या मातृभूमीसाठी प्रेम, त्याग, आदर आणि देशभक्तीचे अमूल्य प्रतीक आहे. त्याला १५० वर्षे पूर्ण होणे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे," अशी भावना यावेळी प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केली.

न्युमोनिया

न्युमोनिया रोखण्यासाठी राज्य शासनाद्वारा "सांस" ही जनजागृती मोहीम 12 नोव्हेंबर 2025 ते 28 फेब्रुवारी 2026 या कालावधीत राबविण्यात येत असल्याची माहिती गोंदिया जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी दिली. या मोहिमेत जिल्ह्यातील आशासेविका गृहभेटी घेऊन न्युमोनिया ग्रस्त बालकांचा शोध घेऊन त्याना नजीकच्या आरोग्य केंद्रात पाठवतील. घरगुती उपायांमध्ये वेळ वाया न घालवता न्युमोनियाची लक्षणे ओळखुन बाळाला ताबडतोब आरोग्य कर्मचारी किंवा जवळच्या आरोग्य केंद्रात घेवून जाण्याचं आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आल आहे.

क्रिकेट

कोलकाता इथं झालेला पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं आज तिसऱ्याच दिवशी भारतावर ३० धावांनी विजय मिळवला, आणि दोन सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. आज दक्षिण आफ्रिकेनं आपला दुसरा डाव कालच्या ७ बाद ९३ धावांवरून पुढे सुरू केला. मात्र हा डाव १५३ धावांत आटोपला. भारतानं पहिल्या डावात ३० धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळं भारताला दुसऱ्या डावात विजयासाठी १२४ धावांचं आव्हान मिळालं. मात्र विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा संघ ९३ धावांवर सर्वबाद झाला.

हवामान

विदर्भात सर्वाधिक कमी किमान तापमान गोंदिया जिल्ह्यात नऊ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या खालोखाल भंडारा इथं १०, नागपूर, यवतमाळ १० पूर्णांक ८, तर वाशीम इथं ११ पूर्णांक २ अंश सेल्सिअस, इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

*****